# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर

(नॅक समिती तर्फे अ+ दर्जा प्राप्त)

## वित्त व लेखाविभाग

विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००४ (महाराष्ट्र)
तार :- बामुसीटी
Web Site - www.bamu.ac.in
E-mail :- financeoffice@bamu.ac.in

वित्त व लेखाधिकारी (नं.) :-२४०३३००
फॅक्स :-२४०३२९९
लेखाधिकारी (नं.) :-२४०३१२४
उप. उपकुलसचिव (लेखा) (नं.) :- २४०३१५५
सहा. कुलसचित (अंकेक्षन) (नं.) :-२४०३१२५
(दुरध्वनी कार्यालय(लेखा):अनुदान २४०३१२६,रोख २४०३१२७,देयक २४०३१२८,वेतन २४०३१२९ रोजकीर्द ०२४०३१३० प्रकाशन ०२४०३१३१)

## परीपत्रक

सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, संशोधन मार्गदर्शक यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, उप-परिसर धाराशिव, मॉडेल कॉलेज घनसावंगी तसेच संतपीठ पैठण येथील विविध शैक्षणिक विभागांना, शैक्षणिक, संशोधनात्मक तसेच दैनंदिन कामकाजासाठी विविध साहित्य, उपकरणांची आवश्यकता असते याकरीता विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागा मार्फत वार्षिक दरकरार, ई-निविदा तसेच GeM पोर्टलव्दारे खरेदी/सेवा/देखभाल इ. बाबतची विहीत प्रक्रिया करण्यात येते.

विद्यापीठ परिसर, उप-परिसर धाराशिव येथील शैक्षणिक विभागा मार्फत विविध साहित्य, वैज्ञानिक उपकरणे इ. खरेदीपुर्वी तांत्रिक बाबी निश्चित करणे आवश्यक आहे जेणेकरुन गुणवत्तापुर्वक व नामांकित कंपनी मार्फत खरेदी/सेवा/देखभाल-दुरुस्ती प्रक्रिया करता येईल. याकरीता सर्वसमावेशक अशी केंद्रिय तांत्रिक समिती असणे आवश्यक आहे. तसेच तांत्रिक समितीने अंतिम केलेल्या तांत्रिक बार्बीनुसार निविदा प्रकिया केल्यास शैक्षणिक विभागांना गुणवत्तापुर्वक व नामांकित कंपन्यांचे साहित्य खरेदी करता येईल. मा. कुलगुरु महोदयांच्या मान्यतेनूसार खालील प्रमाणे **विज्ञान विभागाचे केंद्रिय तांत्रिक समितीचे** गठन करण्यात येत आहे. तसेच **ज्या शैक्षणिक विभागा मार्फत निविदा प्रक्रिया करण्यात येईल त्या विभागाचे विभागप्रमुख हे सदस्य सचिव** असतील.

| अ.क्र. | नांव | विभाग | पद |
|---|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. पी.एस.वक्ते | सीफार्ट | अध्यक्ष |
| २ | प्रा. डॉ. बी.एन.डोळे | पदार्थ विज्ञान विभाग | सदस्य |
| ३ | प्रा. डॉ. एस.बी. शंकरवार | रसायनशास्त्र विभाग | सदस्य |
| ४ | प्रा. डॉ. सुनिता एन. बोर्डे | प्राणीशास्त्र विभाग | सदस्य |
| ५ | डॉ. सचिन भुसारी | रसायनतंत्रशास्त्र विभाग | सदस्य |
| ६ | डॉ. प्रशांत दिक्षीत | संचालक, उप-परिसर धाराशिव | सदस्य |

तरी सर्व संबंधीत शैक्षणिक विभाग आणि संशोधन मार्गदर्शक यांनी विज्ञान विभागाचे केंद्रिय तांत्रिक समिती मार्फत सर्व निविदेच्या तांत्रिकबाबी तयार करणे व प्राप्त झालेल्या निविदेच्या तांत्रिक बाबींची पडताळणी करुन पात्र निविदेच्या खरेदी/सेवा/देखभाल-दुरुस्ती ची शिफारस पुढील कार्यवाहीसाठी करावी.

हे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर ][
संदर्भ क्र. वित्त व लेखा/अनुदान/२०२५/ 1216 ][
दिनांक:- ~~२३~~ 24/०९/२०२५ ][

वित्त व लेखाधिकारी

**********

**प्रतिलीपी:-**

१) मा. कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. कुलगुरुंच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित.
२ मा. प्र कुलगरुंचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. प्र कुलगुरुंच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित.
३) मा. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, सदरील परिपत्रक मा. कुलसचिवांच्या अवलोकनार्थ सादर करण्यास्तव अग्रेषित
४) शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर व उपपरिसर धाराशिव यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव (शैक्षणिक विभागप्रमुखांनी आपल्या विभागा अंतर्गत असलेल्या सर्व संशोधन मार्गदर्शक यांच्या निदर्शनास आणून द्यावे).
५) मा. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उपपरिसर धाराशिव यांना माहितीसतव आणि योग्य त्या कार्यवाहीसतव अग्रेषित.
६) संचालक, यु.एन.आय.सी. यांना देवून कळविण्यात येते की विद्यापीठ संकेतस्थळावर सदरील परिपत्रक प्रसिध्द करावे.
७) अंतर्गत लेखा परीक्षक, वित्त व लेखा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यांना माहितीस्तव.